# B.K. BIRLA CENTRE FOR EDUCATION

SARALA BIRLA GROUP OF SCHOOLS
A CBSE DAY-CUM-BOYS' RESIDENTIAL SCHOOL

## TERM-1 EXAMINATION (2026-27)

**MARATHI [SET-TWO]**

| | |
|---|---|
| Class : VII | Duration: **3** Hrs |
| Date : 31 .08.2026 | Max. Marks: **80** |
| Admission No.: | Roll No.: |

---

कृतिपत्रिकेसाठी सूचना :

(1) स्वच्छता, नीटनेटकेपणा व लेखननियमांनुसार लेखन यांकडे जाणीवपूर्वक लक्ष दयावे.

---

## विभाग – अ (वाचन व आकलन )

**प्र 1खालील अपठित उतारा वाचून दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा:–** (5X1=5)

एकदा एक शिकारी शिकारीसाठी जंगलात आला. त्याने एक जाळे शेतामध्ये पसरून ठेवले थोडयाच वेळात कबुतरांचा एक थवा आकाशातून उडत तेथे आला. सर्व कबुतरे दाणे टिपण्यासाठी खाली उतरले. आणि सर्वजण जाळयात अडकले होते. कबुतरांच्या प्रमुखाला एक युक्ती सुचली तो सर्वांना म्हणाला जाळयासकट आकाशात उडा. आणि जाळयासह ती कबुतरे दूर उडून गेली आणि वनात इतर प्राण्याच्या मदतीने जाळयातून मुक्त झाली. एकीच्या बळामुळेच हे शक्य झाले

(1) कबुतरांच्या प्रमुखाला काय सुचली?

**अ** कला **ब** विचार **क** युक्ती

(2) कशाच्या बळामुळे त्याची सुटका झाली?

**अ** एकीच्या **ब** नेकीच्या **क** श्रीमंतीच्या

(3) शिकारी शिकारीसाठी कोठे गेला?

**अ** शेतात **ब** वनात **क** जंगलात

(4) त्याने शेतामध्ये काय पसरून ठेवले?

**अ** फळे **ब** जाळे **क** दाणे

(5) कोणाचा थवा आकाशात उडत होता?

**अ** कबुतरांचा **ब** चिमण्यांचा **क** घारींचा

**प्र 2 अपठित पदयांश –** (5X1=5)

पावसा रे पावसा तू दिसतो कसा ?
टपटप आभाळातून पडतो कसा ?
वाटतं तुझ्यात ओलेचिंब भिजावे
मित्रांसोबत नाचत गात हुंदडावं !

वाहत्या पाण्यात एक नाव चालवावी
हळूच एक बुडती मुंगी चढवावी !
आई खेळू देत नाही सर्दी होईल म्हणून
करमत नाही मुळीच मला घरी बसून

(1) मुलाला कोणासोबत नाचावासे वाटते?

**अ** मित्र **ब** मामा **क** काका

(2) पाऊस कसा पडतो?

**अ** धो धो **ब** सो सो **क** टपटप

(3) वाहत्या पाण्यात काय चालवावी असे कवीला वाटते?

**अ** नाव **ब** जहाज **क** बोट

(4) पावसात कोण खेळू देत नाही?

**अ** बाबा **ब** भाऊ **क** आई

(5) पाऊस कोठून पडतो?

**अ** घरातून **ब** आभाळातून **क** खिडकीतून

**खंड ख व्याकरण**

**प्र 3 समानार्थी शब्द लिहा– (कोणतेही दोन)** **(2X1=2)**

(1) राग =

(2) गीत =

(3) नयन =

**प्र 4 विरुधार्थी शब्द – ( opposites ) (कोणतेही दोन)** **(2X1=2)**

(1) रडणे x

(2) आनंदी x

(3) नंतर ×

**प्र 5 लिंग बदला – ( change the gender ) (कोणतेही दोन)** **(2X1=2)**

(1) पुत्री =

(2) राणी =

(3) काकी =

**प्रश्न 6 वचन बदला – (write the plural noun ) (कोणतेही दोन)** **(2X1=2)**

(1) किल्ला =

(2) घर =

(3) गोष्ट =

**प्र 7 खाली प्रत्यय लावून नवीन शब्द बनवा –** **(2X1=2)**

(1) टेबला + खाली =

(2) झाडा + खाली =

**प्र 8 खालील वाक्यातील सर्वनाम ओळखा :–** **(2X1=2)**

(1) मी आणि तू उदया खेळायला जाऊ.

(2) भावाने माझी अभ्यासात मदत केली.

**प्र 9 काळ ओळखा –** **(2X1=2)**

(1) घराचा दरवाजा बंद झाला.

(2) आम्ही उदया गावाला जाणार.

**प्र 10 खालील वाक्यातील क्रियापद ओळखा –** **(2X1=2)**

(1) रमन संध्याकाळी शाळेतून घरी आला.

(2) नीताने काल मांजरीला दुध दिले.

## खंड ग साहित्य

**प्रश्न 11 कोण कोणास म्हणाले लिहा –** **(2X1=2)**

(1) मग चला रे ओढा त्या कामधेनूला.

(2) ही तयारी आम्ही नाही केली कामधेनूने केली.

**प्रश्न 12 खालील प्रश्नांची उत्तरे लिहा – ( कोणतेही सात )** **(7x2=14)**

(1) सातारा जिल्हातील थंड हवेचे ठिकाण कोणते?

(2) मनुष्याने नेहमी कोणत्या गोष्टीचा शोध घ्यावा ?

(3) श्वानवृत्ती कशास म्हटले आहे ?

(4) कधी आपलेच नुकसान होते ?

(5) विश्वमित्र कोणाच्या आश्रमात गेले व का?

(6) विश्वमित्रांनी कोणता निश्चय केला व का ?

(7) निजबाळांसह कुरणात कोण बागडत आहे ?

(8) कोणाचा रोष मावळला ?

(9) वर्ल्ड  हेरिटेज साईट कोणाला म्हणतात ?

**प्र 13 पठित गदयांश –** **(5X1=5)**

माळशेज घाट हा नगर–कल्याण रस्त्यावर आहे . येथे लोक मुसळधार पावसाचा आनंद घेण्यासाठी येतात. येथे भिजतांना जर हात उंचावला तर हातात ढग येण्याची शक्यता असते. चोहीकडे मखमली हिरवळीचे गालीचे पसरलेले  दिसतात.अशा धुंद वातावरणात पावसात चिंब होण्याचा आनंद वेगळाच असतो. हा घाट मुंबई–पुण्यापासून जवळच आहे. कल्याणपासून 86 कि.मी. चा टप्पा दीड–दोन तासात संपतो. माळशेज परिसरात आलं की उंचच उंच गिरिशिखरं दिसतात.

(1) कल्याण पासून हा घाट किती कि.मी. अंतरावर आहे?

(2) हात उंचावला तर हातात काय येण्याची शक्यता असते?

(3) माळशेज परिसरात आलं की काय दिसतात?

(4) माळशेज घाट कोणत्या रस्त्यावर आहे ?

(5) चोहीकडे कशाचे गालीचे पसरलेले दिसतात?

**प्र 14 पठित पदयांश –** **(5X1=5)**

श्रावणमासी हर्ष मानसी हिरवळ दाटे चोहीकडे
क्षणात येते सरसर शिरवे क्षणात फिरूनी ऊन पडे
वरती बघता इंद्रधनूचा गोफ दुहेरी विणलासे
मंगल तोरण काय बांधिले नभोमंडपी कुणि भासे
झालास सूर्यास्त वाटतो सांज अहाहा! ते उघडे
तरुशिखरावर उंच घरांवर पिवळे पिवळे ऊन पडे

(1) तरुशिखरांवर कसे ऊन पडले आहे ?

(2) क्षणात काय येते ?

(3) कवितेत कोणत्या महिन्याचे वर्णन केले आहे ?

(4) नभोमंडपी कसे तोरण बांधले आहे ?

(5) कशाचा गोफ विणला आहे ?

**प्र 15 जोडया लावा –** **(4X1=4)**

1 विचार – दूर

2 भरती – छोटी

3 जवळ – अविचार

4 मोठी – ओहोटी

**प्र 16 रिकाम्या जागा भरा –** **(4X1=4)**

**( गिरिशिखरे / रानफुले / ऋषीने / प्रेक्षणीय )**

(1) उंचच उंच ––––––– दिसतात

(2) असंख्य प्रकारची –––––– दिसतात.

(3) एका ––––– आपला पराभव केला.

(4) महाराष्ट्रात बरीच ––––––– स्थळे आहेत.

**प्रश्न 17 आपल्या आवडत्या घडयाळासाठी एक आकर्षक जाहीरात तयार करा –** **(1X5=5)**

**प्रश्न 18 निबंध लेखन :– ( कोणताही एक )** **(1X5=5)**

(1) माझा आवडता सण

(2) माझा आवडता खेळ

(3) वृक्ष आपले मित्र

**प्र 19 स्वपरिचय लिहा :– ( my self in marathi )** **(1X5=5)**

**प्र 20 :–प्रत्र लेखन –** **(1X5=5)**
आपली खुशाली कळविणारे पत्र मामाला लिहा –
**किंवा**
आपल्या वाढदिवसाचे निमंत्रण देणारे पत्र मित्राला लिहा –

:::::::::::::::::::::: **समाप्त** ::::::::::::::::::::::::